# लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शुक्रवार – १८ ऑगस्ट २०२३

वर्ष – ३७ वे

अंक – १३८

पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com







**आमदार जबाबदारी घेतील का? दै. भूकंपच्या अग्रलेखाची दखल**

# आ. अमित देशमुख यांनी दिल्या पालिका प्रशासनास कडक सूचना

**लातूर : लातूर शहरातील वाहतुकीचा प्रश्न, अनाधिकृत बांधकाम, पार्किंगचा अभाव, कचरा प्रश्न, अनाधिकृत होर्डींग, पाणी पुरवठ्यातील अनियमीतता आदीपासून माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी पालिका प्रशासनाला अत्यंत कडक शब्दात सुनावले. शहरातील विविध प्रश्नासंदर्भात आयोजीत बैठकीत ते बोलत होते.**



शहरातील वाहतूक व्यवस्था, खड्डे, अपघात, अनाधिकृत बांधकाम, कचरा-पाणी सुविधातील अनियमितता, बांधकाम परवाने, बेकायदा होर्डींग आदी संदर्भात सांज दै. भूकंपने दि. १५ ऑगस्ट रोजी आमदार जबाबदारी घेतील का? आणि दि. १६ ऑगस्ट रोजीच्या अंकात भविष्यातील लातूर जिल्हा या मथळ्याखालील दोन अग्रलेखातून शहरातील समस्या संदर्भात लक्ष वेधून हे प्रश्न सोडविण्यासाठीची जबाबदारी आमदारांची नाही का? आ. अमित देशमुख शहरातील समस्यांकडे लक्ष देत नाही, असे लिखाण केले होते.

माजी पालकमंत्री तथा लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे आ. अमित देशमुख यांनी काल १७ ऑगस्ट रोजी महापालिका प्रशासन, शहर वाहतूक शाखा आरटिओ यांची शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी शहरातील नागरिकांची गैरसोय होऊ नये, बेकायदा बांधकाम थांबवावेत, शहरात अनाधिकृ होर्डींग व जाहिरातींसाठी रस्त्याच्या मधोमध उभे केलेले खांब, घंटागाडीच येत नाही अशा तक्रारी, शहरातील रस्त्याच्या कडेला चौकात खुल्या जागेत साचलेले कचऱ्याचे ढिग, शहरातील अस्वच्छता, सिग्नल, स्ट्रीट लाईट, बांधकामाचा दर्जा याबाबत सविस्तर आढावा घेतला, पालिका प्रशासनाला कडक शब्दात सुनावले एवढेच नव्हे तर निकृष्ट कामे करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाका, कर्तव्यात कसूर करणाऱ्यांना कार्यमुक्त करा अशा शब्दात तंबी दिली.

या बैठकीस अतिरीक्त आयुक्त शिवाजी गवळी, उपायुक्त मयुरा शिंदेकर, प्रादेशिक परीवहन अधिकारी विजय भोये, शहर वाहतुक पोलीस निरीक्षक गणेश कदम, विणा पवार, नगररचनाकार निकीता भांगे, सहायक आयुक्त मंजुषा गुरमे, क्षेत्रीय अधिकारी बडू किसवे, कलीम शेख, समाधान सुर्यवंशी, विजय राजूरे, पाणी पुरवठा अभियंता विजय चव्हाण, शहर अभियंता नवनाथ केंद्रे, डॉ. महेश पाटील, रमाकांत पिडगे, रूकमानंद वडगावे, जरीचंद ताकपीरे, बालाजी रूपनर, रवी कांबळे, लक्ष्मण जाधव, सतिश टेकाळे, देवडे, खदीर शेख, कोळगणे, समद शेख आदी उपस्थित होते.



# रोहयोंतर्गत बांबू लागवड : कार्यशाळा

लातूर : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत लातूर जिल्ह्यात २० हजार हेक्टरवर बांबू लागवड करण्यात येणार असून आज मिशन मनरेगाचे महासंचालक श्री. नंदकुमार यांच्या अध्यक्षतेत दयानंद सभागृहात बांबू लागवड चर्चासत्र बैठकीस प्रारंभ झाला.

या बैठकीस बांबू लागवड समितीचे सदस्य माजी आ. पाशा पटेल, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहाय्यक जिल्हाधिकारी नयन गोयल, योगेश शिंदे, संतोष राणे, सलीम सय्यद, एन. टी. पी. सी चे अधिकारी, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सरपंच, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, ग्रामसेवक, तलाठी, वनपाल, सामाजीक वनीकरण अधिकारी, कर्मचारी, नरेगाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी उपस्थित आहेत. कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर बांबूच्या वस्तू देऊन पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळा चालू आहे.



## धोंडी...धोंडी...पाणी दे

लातूर जिल्ह्यात २० ते २५ दिवस झाले पाऊसच नाही. आज प्रभुराज प्रतिष्ठान व एकात्मीक बालविकास केंद्र लातूरच्या वतीने संभाजीनगर खाडगाव रोड परिसरात बाल गोपालांनी धोंडी...धोंडी पाणी दे म्हणत वरूणराजाकडे साकडे घातले. (फोटो-तम्मा पावले)

# अर्ज कोठे, कोणाकडे हि सबब बंद

## ई-ऑफीस प्रणालीचा फायदा



लातूर : प्रशासनात नागरिकांनी दिलेला अर्ज, तक्रार मिळालीच नाही, तो गहाळ झाला. असेल तर कोणाचे टेबलावर आहे हे माहित नाही, अशी सबब सांगणे ई-ऑफीस प्रणालीमुळे बंद झाले आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनदिनी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात ई-ऑफीस प्रणालीचा शुभारंभ क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय एखाद्या नागरिकांनी अर्ज, तक्रार दिल्यानंतर तो अर्ज ऑफलाईन पद्धतीने पेशकार, नायब तहसीलदार, तहसीलदार, आरडीसी किंवा कक्षप्रमुख, शेवटी मंजुरीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे जात असत, दरम्यान दिलेला अर्ज मिळालाच नाही, गहाळ झाला, तो कोणाच्या टेबलावर आहे माहित नाही, असे उत्तर दिले जायचे, नागरिकांना या लालफितीच्या कारोभाराचा फटका बसायचा आता ई-ऑफीस प्रणाली चालू केल्याने नागरिकांचा अर्ज, तक्रारीची नोंद केली जाईल. कार्यालयीन कामकाजात ती ऑनलाईन घेतली जाईल. प्रशासनाच्या प्रत्येक टप्प्यावर अमूक अर्ज या क्षणाला कोठे आहे, किती दिवसापासून पेंडींग आहे, हे सांगता येईल आणि वरिष्ठांना पाहताही येईल.

ई-ऑफीस प्रणालीमुळे नागरिकांच्या चकरा वाचतील. एखादा अर्ज नेमके कोणाकडे हे पाहता येईल. सुट्टी असेल, संबंधीत अधिकारी घरी, बाहेरगावी असला तरी ई-प्रणालीमुळे ती फाईल 'मुव्ह' करता येऊ शकते. शेवटी ही फाईल जिल्हाधिकारी यांच्याकडे जाईल, त्यांच्या डिजीटल स्वाक्षरीने त्या अर्जावर आदेश देता येईल, अशी ही कार्यप्रणाली आहे. या प्रणालीमुळे प्रशासनास सतर्क रहावे लागणार असले तरी जनतेसाठी हि प्रणाली सोयीची आहे. झिरो पेन्डसी पद्धतीने कामकाज होणार आहे.

ई-ऑफीस प्रणाली हि सद्या जिल्हाधिकारी लातूर कार्यालय पातळीवर चालू आहे. उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, ईतर कार्यालय व ग्रामपंचायतपर्यंत राबविण्यात येणार असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. ना. संजय बनसोडे यांनी या प्रणालीमुळे कामकाजात गती व पारदर्शकता येईल अशी अपेक्षा व्यक्त करून काही सूचना केल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा प्रकल्प अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कक्ष श्री प्रविण पोंदे यांनी मंत्री महोदयासमोर सादरीकरण केले.

या कार्यक्रमास जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सहाय्यक जिल्हाधिकारी नयन गोयल, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे व संबंधीत अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# निलकंठेश्वर मंदिरातील दानपेटी चोरली

लातूर : मौजे कोष्टगाव, ता. रेणापूर येथील निलकंठेश्वर मंदिरातील दानपेटीच उचलून नेल्याचा प्रकार रात्री घडला असून या प्रकरणी किनगाव पोलिसांत अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलकंठेश्वर मंदिरातील सभा मंडपात चोरट्यांनी प्रवेश करून तिथे असलेली दानपेटी चोरून नेली आहे. या दानपेटीत १४ ते १५ हजा रूपये असावेत असे तक्रारीत म्हटले आहे.

## त्यांच्या मते....

**▣ विरोधक रोज उठल्यापासून प्रार्थना करतात की एकनाथ शिंदे यांचे मुख्यमंत्रीपद जाऊ दे, पण कावळ्याच्या शापाने कोण मरत नसतं.** – एकनाथ शिंदे

☛ मुख्यमंत्रीपद घालविण्यासाठी प्रार्थना नव्हे 'बंड' करावे लागते.

**▣ होय, आम्हा दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा मुख्यमंत्री यांच्या खुर्चीवर डोळा आहे. पण तो त्या खूर्चीच्या संरक्षणासाठी.** – देवेंद्र फडणवीस

☛ संरक्षण संधी मिळेपर्यंतच ना?

**▣ सामुदायीक शक्ती एकत्र झाली तर असलं राजकारण करणाऱ्यांना उलथून टाकायला वेळ लागणार नाही.** – शरद पवार

☛ आज तरी 'मोदी' प्रमाणे एकटा शक्तीवान कोण नाही.

**▣ आपण शरद पवार यांच्याबरोबर, पण विकास कामांसाठी अजित पवार यांच्याकडे जाण्यात काहीही गैर वाटणार नाही.** – खा. अमोल कोल्हे

☛ दादा 'अटी'वर विकास कामे करतात म्हणे.



# मध्य हंगाम विमा लागू करा

## -आ. बाबासाहेब पाटील

लातूर : लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी नव्याने रुजू झालेल्या श्रीमती वर्षाताई ठाकूर - घुगे यांची भेट सत्कार केला व अभिनंदन केले.

तसेच अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील अहमदपूर व चाकूर तालुक्यामध्ये एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासून पावसाने खंड दिला आहे. त्यामुळे पिके सुकून जात आहेत, तरी अहमदपूर व चाकूर तालुक्यामध्ये २१ दिवसापेक्षा जास्त पावसाचा खंड पडलेल्या महसूल मंडळात मध्य हंगाम विमा लागू करण्याच्या मागणीचे निवेदन आ. बाबासाहेब पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. सलग २१ दिवसांपेक्षा जास्त पावसाने खंड दिला तर मध्य हंगाम पीक विमा लागू करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असतो. असे या निवेदनात आ. बाबासाहेब पाटील यांनी नमूद केले आहे. प्रसंगी समवेत चाकूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक यशवंतराव जाधव, येलादेवी उमरगा चेअरमन राजकुमार सोमवंशी, मनोज पाटील आदी उपस्थित होते.

# लातूर जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धेस प्रारंभ



लातूर : पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर गुरुवारपासून २७ व्या लातूर जिल्हा पोलिस क्रीडा स्पर्धा,२०२३ चे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. या स्पर्धेत कबड्डी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल हॉकी इतर ऍथलेटिक्स खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पोलीस साठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांच्या हस्ते मशाल पेटवून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

दररोजच्या धावपळीच्या जीवनातून थोडासा पोलिसांना विरंगुळा मिळावा, नेहमीचे कर्तव्य करताना निर्माण होणारा ताण कमी होण्यासाठी व मनोरंजन म्हणून लातूर जिल्हा पोलीस दलाच्या तर्फे २७ वी लातूर जिल्हा पोलीस क्रीडा स्पर्धा २०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे.

पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर सदरच्या स्पर्धा १९ ऑगस्टपर्यंत पार पडणार असून संपूर्ण लातूर जिल्ह्यातील विविध शाखा व पोलीस ठाण्याला कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व अमलदारांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे. विविध ठाण्यातील व शाखेतील पोलिसांनी यावेळेस शानदार संचालन केले.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या उपस्थितीत झाले. त्यानंतर फुटबॉल सामना घेण्यात आले. सदरच्या स्पर्धा या १९ ऑगस्ट पर्यंत होणार असून १९ ऑगस्टला सदर क्रीडा स्पर्धातील विजयी खेळाडूंना मा. जिल्हाधिकारी, लातूर यांचे हस्ते बक्षीस वितरण क्रीडा स्पर्धेचा समारोप होणार आहे.

पोलिसांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळावा, आरोग्य चांगले राहावे, यासाठी पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या स्पर्धेत पोलिस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# 'टू मच डेमोक्रॅसी'चा उद्या खास शो

लातूर : अभिजात फिल्म सोसायटी तर्फे शनिवार, दि. १९ ऑगस्ट २०२३ रोजी 'टू मच डेमोक्रॅसी' ही डॉक्यूमेंटरी दाखवली जाणार आहे. श्रीकिशन सोमाणी शाळेच्या सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता हा शो होणार असून दिग्दर्शक वरुण सुखराज यावेळी उपस्थित राहणार आहेत. शो नंतर ते प्रेक्षकांशी संवाद साधतील.

दिल्लीच्या सीमांवर २०२० मध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनावर आधारित ही फिल्म आहे. लोकशाहीचा संकोच करणारे वातावरण सध्या सर्वत्र असताना बातमी आणि माहिती याच्यापलीकडे जाणारी व विशिष्ट विचार घेवून उभी राहणारी ही फिल्म आहे. आणि म्हणून ती तटस्थ नाही तर लोकशाहीचा पक्ष घेवून उभी आहे.

आतापर्यंत काही आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात व निवडक ठिकाणी दाखवली गेलेली ही फिल्म 'अभिजात' ने लातूरकरांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे. शो साठी प्रवेश नि:शुल्क असून जास्तीत जास्त संख्येने लोकांनी ही फिल्म बघावी व लोकशाही बळकटीकरणाच्या बाजूने उभे रहावे, असे आवाहन 'अभिजात' तर्फे करण्यात आले आहे.

# सेमीकंडक्टर कोर्स म्हणजे काय हे समजून घ्या सोप्या भाषेत

विविध उद्योगांमध्ये आणि मुख्यत: इलेक्ट्रॉनिक उद्योगात सेमीकंडक्टरना जास्त मागणी आहे. हे लक्षात घेऊन भारत सरकार देशात सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन स्थापन करण्याचे काम करत आहे. इंडिया सेमीकंडक्टर असोसिएशन (ISA) च्या मते, भारतीय सेमीकंडक्टर उद्योगामध्ये २०२५ पर्यंत १.७५ ते २ दशलक्ष प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या जोडण्याची क्षमता आहे.

इतर अनेक नवीन-युग कार्यक्रमांव्यतिरिक्त, AICTE सेमीकंडक्टर्सवरील विशेष अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देत आहे. एआयसीटीईच्या निर्देशानुसार यूजी, पीजी आणि डिप्लोमा स्तरावर या तंत्रात १६,००० जागा सुरू करण्यात आल्या आहेत.

सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजी कोर्ससाठी विद्यार्थ्यांना मटेरियल सायन्स आणि कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंगची माहिती असणे आवश्यक आहे. यासोबतच गणित, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रिक सर्किट आणि इलेक्ट्रॉनिक्सचे प्राथमिक ज्ञान आवश्यक आहे.

भारत सरकारच्या 'सेमीकंडक्टर मिशन' योजनेंतर्गत उच्च शिक्षण संस्थेसाठी नोटीस जारी करण्यात आली आहे. भारतातील सेमीकंडक्टर तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाच्या विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने विविध प्रकारचे समर्थन आणि फायदे मिळू शकतात.

देशातील सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन (फॅब्स) चे उत्पादन आणि स्थापना मजबूत करण्यासाठी सेमीकंडक्टर तंत्रज्ञानावरील अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाला भारत सरकारकडून विविध योजनांद्वारे प्रोत्साहन मिळत आहे. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी भारत सरकार मदत करत आहे. २०३२ पर्यंत उत्पादन क्षेत्र भारतात आणणे आणि चीनला मागे टाकणे हे सरकारचे लक्ष आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, २०३० पर्यंत, केवळ सेमीकंडक्टर तंत्रज्ञान १ ट्रिलियन मार्केट असेल अशी अपेक्षा आहे. सर्व संबंधित किंमती वाढवणाऱ्या अनुप्रयोगांसह, २०३० पर्यंत हे सहजपणे ३ ते ४ ट्रिलियन किंवा भारताच्या अंदाजे GDP च्या निम्मे ७ ते ८ ट्रिलियन इतके असू शकते.

# करू नका सुरक्षेशी तडजोड, टायरचे आयुष्य वाढवण्यासाठी आजच करा हे काम

सुरक्षितता हा एक असा शब्द आहे ज्यामध्ये कधीही तडजोड केली जाऊ शकत नाही, कारण जर तुम्ही सुरक्षिततेशी तडजोड केली, तर तुम्हाला नंतर त्याची मोठी किंमत चुकवावी लागू शकते. अनेकदा कार चालवताना तुम्ही असे अनेक टायर (कार टायर्स टिप्स) रस्त्यावर कुठेतरी पाहिले असतील, जे फुटत असावेत,




गाडी चालवताना टायर फुटण्याच्या अनेक घटना समोर येतात आणि विशेषत: उन्हाळ्यात अशा प्रकारच्या घटना वाढतात.

तुमच्या मनात अनेक प्रश्न असतील जसे की कारचे टायर कसे फुटतात आणि कारच्या टायरचे आयुष्य वाढवण्याचा काही मार्ग आहे का? आज आम्ही तुम्हाला अशाच काही सामान्य पण महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देणार आहोत.

जरी कारचा टायर फुटण्यामागे अनेक कारणे असू शकतात, परंतु येथे एका गोष्टीकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे, ते म्हणजे जेव्हाही तुम्ही कार चालवता तेव्हा कारच्या टायरमधील तापमान हळूहळू वाढू लागते.

गाडीचे तापमान वाढल्याने काय होऊ शकते, हे सांगण्याची कदाचित गरज नाही, पण तरीही ज्यांना याची जाणीव नाही त्यांना सांगा की टायरमधील तापमान मर्यादेपेक्षा जास्त वाढले, तर टायर फुटण्याची शक्यता खूप जास्त असते.

उन्हाळ्यात गाडीच्या टायरमधील तापमान वाढू लागते, पण जर तुम्ही एक महत्त्वाची गोष्ट केली तर तुम्ही हे तापमान कमी करू शकता. तुम्ही पेट्रोल पंपावर गाडीत इंधन म्हणजेच पेट्रोल-डिझेल घेण्यासाठी जात असाल आणि गाडीत हवाही भरत असाल, पण इथे स्वतःला विचारा की तुम्हाला टायरमध्ये कोणती हवा येतेय?

सामान्य हवा टायरमधील वाढत्या तापमानावर नियंत्रण ठेवू शकत नाही, परंतु तुम्ही पेट्रोल पंपावर वेगळी नायट्रोजन एअर लाइन मिळवू शकता आणि टायरमध्ये सामान्य ऐवजी नायट्रोजन हवा मिळवू शकता. नायट्रोजन हवेचे तापमान थंड ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे टायरचे आयुष्य वाढते.

# २० ऑगस्टला रिलीज होणार सीमा हैदरवर बनत असलेल्या चित्रपटाचे पहिले गाणे, समोर आले पोस्टर

पाकिस्तानातून अवैधरित्या भारतात आलेल्या सीमा हैदरची सध्या देशभरात चर्चा आहे. सीमा हैदर सर्वत्र दिसत आहे. आता सीमा हैदरवरही एक चित्रपट बनत आहे, ज्याचे पहिले पोस्टर निर्मात्यांनी रिलीज केले आहे. याशिवाय चित्रपटाचे पहिले गाणेही तयार करण्यात आले आहे, जे दोन दिवसांनी म्हणजेच २० ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.


सीमा हैदर आणि नोएडातील सचिन मीना यांच्या प्रेमाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. निर्माता अमित जानी ही कथा पडद्यावर दाखवणार आहेत. या चित्रपटात अभिनेत्री फरहीन फालक सीमा हैदरच्या भूमिकेत दिसणार आहे. भरत सिंह या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत.

सीमा हैदरच्या कराची टू नोएडा या चित्रपटातील पहिले गाणे २० ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे. स्वतः निर्माता अमित जानी यांनी ट्विटरवर याचे पोस्टर जारी करून याची घोषणा केली आहे. हे गाणे प्रीती सरोज हिने गायले असून निर्माते अमित जानी यांनी गीते लिहिली आहेत. हा चित्रपट जानी फायरफॉक्सच्या बॅनरखाली बनवला जात आहे.

# किती असते विमानाचे मायलेज? पेट्रोल किंवा डिझेल, कोणत्या इंधनने भरते उड्डाण

तुम्ही कार-बाईक किंवा इतर कोणतेही वाहन चालवत असाल तर तुम्ही मायलेजकडेही लक्ष देत असाल, पण हवेत उडणारे विमान, उड्डाण किती मायलेज देते, कोणते इंधन वापरले जाते, याचा कधी विचार केला आहे का? आणि या इंधनाची किंमत किती आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला माहीत आहेत का? जर तुमचे उत्तर नाही असेल तर आज आम्ही तुम्हाला फ्लाइटशी संबंधित काही खास माहिती देत आहोत.

प्रथम कोणत्या विमान कोणत्या इंधनावर उड्डाण करते याचे उत्तर आम्ही देतो. विमान असो वा हेलिकॉप्टर, त्यात खास इंधन वापरले जाते. हे इंधन एव्हिएशन केरोसिन उर्फ क्यूएव्ही




म्हणून ओळखले जाते.

दुसरा सर्वात मोठा प्रश्न हा आहे की या इंधनाची किंमत किती आहे आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांसाठी दर समान आहे का? इंडियन ऑईलच्या अधिकृत साइटवर दिलेल्या माहितीनुसार, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांसाठी इंधनाची किंमत वेगळी आहे.

दिल्लीत किंमत ९८,५०८.२६ रुपये प्रति किलोलीटर आहे, म्हणजे एका लिटरची किंमत सुमारे १०७ रुपये आहे. तुमच्या माहितीसाठी आम्ही तुम्हाला सांगतो की एका किलोलीटरमध्ये १००० लिटर इंधन असते.

कोलकात्यात किंमत १,०७,३८३.०८ रुपये प्रति किलोलीटर आहे, म्हणजे एका लिटरची किंमत सुमारे १०७.३८ रुपये आहे. मुंबईतील दर ९२,१२४.१३ रुपये प्रति किलो आहे, म्हणजे एका लिटरची किंमत सुमारे ९२.१२ रुपये आहे.

बोईंग ७४७ बनवणाऱ्या कंपनीच्या म्हणण्यानुसार, फ्लाइटला एक किलोमीटर उड्डाण करण्यासाठी सुमारे १२ किलोलीटर इंधन लागते आणि विमानाचा वेग ९०० किमी प्रति तास (जमिनीचा वेग) असतो. फ्लाइटमध्ये एकाच वेळी ५६८ लोक एकत्र बसून प्रवास करू शकतात. उड्डाण करताना विमान एका तासात २४०० लिटर इंधन वापरते आणि एका तासात ९०० किलोमीटरपर्यंतचे अंतर कापते, असा अनेक अहवालांमध्ये उल्लेख आहे. त्यानुसार, एक किलोमीटरसाठी २.६ लिटर इंधन वापरले जाते.



# आता सिमकार्डची पडताळणी न केल्यास ठोठावला जाणार १० लाखांचा दंड

आजकाल सिमकार्डच्या माध्यमातून फसवणुकीच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत यातून होणाऱ्या फसवणुकीचे कंबरडे मोडण्यासाठी सरकारने विशेष पावले उचलली आहेत. वास्तविक, सरकारने आता सिम डीलरची पडताळणी अनिवार्य केली आहे. फसवणुकीचे कंबरडे मोडण्यासाठी सरकारने विशेष पावले उचलली आहेत. ज्या अंतर्गत आता सिम विकणाऱ्या डीलर्ससाठी पोलिस आणि बायोमेट्रिक पडताळणी आवश्यक झाली आहे. यासोबतच सरकारने मोठ्या प्रमाणात सिम खरेदी करण्याची पद्धतही बंद केली आहे. बल्क सिम खरेदी प्रणालीच्या जागी व्यवसाय कनेक्शनची संकल्पना आणली जात आहे. दुसरीकडे, जर कोणताही सिम विक्रेता अवैधरित्या सिम विकताना आढळला किंवा पडताळणी केली नाही, तर त्याच्यावर १० लाख रुपयांचा दंड ठोठावला जाईल.

सिमची अवैध आणि मोठ्या प्रमाणात खरेदी थांबवण्यासाठी व्यवसाय संकल्पना आणली जाईल. यामध्ये कोणत्याही व्यवसाय समूह, कॉर्पोरेट किंवा कार्यक्रमासाठी सिम खरेदी करण्याची सुविधा दिली जाईल. याद्वारे कंपन्यांच्या नोंदणीच्या आधारे सिम दिले जातील. जर एखाद्या कंपनीला मोठ्या प्रमाणात सिम विकत घ्यायचे असेल, तर त्यातही वैयक्तिक केवायसी करावे लागेल.

सरकारच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, पोलिस पडताळणीशिवाय सिमकार्ड विकल्यास १० लाख रुपयांपर्यंतचा दंड आहे. दूरसंचार मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या म्हणण्यानुसार, देशात सुमारे १० लाख सिम कार्ड डीलर आहेत, ज्यांना पोलिस पडताळणी करावी लागेल. याशिवाय व्यवसायाची केवायसीही करावी लागणार आहे.

वैष्णव म्हणाले की, आजकाल सिम विकणाऱ्या डीलर्सचा बराचसा निष्काळजीपणा समोर आला आहे. त्यांचा मुख्य भर फक्त सिम विकण्यावर असतो. यावर मात करण्यासाठी विक्रेत्यांचे बायोमेट्रिक आणि पोलिस व्हेरिफिकेशन आवश्यक करण्यात येत आहे. सर्व झजड डीलर्सची नोंदणी देखील अनिवार्य असेल. या प्रकरणात कोणताही व्यापारी निष्काळजी दिसल्यास त्याची जबाबदारी निश्चित केली जाऊ शकते. दूरसंचार मंत्री म्हणाले की संचार साथी पोर्टल लाँच केल्यानंतर त्यांनी सुमारे ५२ लाख बनावट कनेक्शन निष्क्रिय केले आहेत. ६७ हजार डीलर्सना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. यासह ३०० पैकी अनेक एफआयआर नोंदवले आहेत.

लोक मोठ्या प्रमाणात सिम्स खरेदी करतात पण त्यात २०% गैरवापर आहे. त्यामुळे सायबर फसवणूक होते. सविस्तर अभ्यास केल्यानंतर घाऊक खरेदीची पद्धत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बिझनेस कनेक्शनची संकल्पना त्याच्या जागी येईल. यामध्ये कोणत्याही व्यावसायिक समूह, कॉर्पोरेट किंवा कार्यक्रमासाठी व्यवस्था केली जाईल. यामध्ये नोंदणीच्या आधारे सिम दिले जातील.

# चंद्रानंतर आता सूर्याची पाळी, इस्त्रो आता आदित्य एल-१ लाँच करण्याच्या तयारीत, जाणून घ्या किती खास आहे ते




इस्रो सूर्याचा अभ्यास करण्यासाठी कोणती मोहीम सुरू करण्याच्या तयारीत आहे? ते कधी आणि कुठून सुरू होणार? सूर्याचा अभ्यास करण्यासाठी यापूर्वी कोणते मिशन पाठवले होते? या मिशनचे नाव काय आहे? ऑक्टोबर २०२३ नंतर कोणत्याही परीक्षेत असे प्रश्न तुमच्यासमोर विचारले जाऊ शकतात. त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न या प्रतीत करण्यात आला आहे.

भारताची अंतराळ संस्था खडठज आदित्य L-1 लाँच करण्याच्या तयारीला अंतिम रूप देण्याच्या प्रक्रियेत आहे. दुसरीकडे, भारतीय चांद्रयान-३ च्या यशाचा आनंद साजरा करत आहेत, तर ISRO आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा स्पेस स्टेशनवरून आदित्य एल-१ लाँच करण्याच्या शक्यतेवर काम करत आहे. आदित्य एल-१ श्रीहरिकोटा येथे पोहोचला आहे. आतापर्यंतच्या योजनेनुसार सूर्याचा अभ्यास करणारी ही देशातील पहिली मोहीम सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रक्षेपित केली जाईल. हे इस्रोच्या यूआर राव उपग्रह केंद्रात तयार करण्यात आले आहे.

आदित्य एल-१ सूर्यावर अभ्यास करेल. पृथ्वीपासून १.५ दशलक्ष किलोमीटरचा प्रवास करून ते हॅलो ऑर्बिटमध्ये पोहोचेल. या कक्षेत उपग्रह बसवण्याचा फायदा म्हणजे येथून सूर्यावर सतत लक्ष ठेवता येईल, असे इस्रोचे मत आहे. ही अशी जागा आहे जिथे सूर्यग्रहणाचा प्रभाव पडत नाही. सूर्याच्या हालचाली आणि त्याचा अवकाशावर होणारा परिणाम याचा सखोल अभ्यास करणे सोपे होईल.

आदित्य एल-१ सोबत सात पेलोड (वेगवेगळे उपकरण) अवकाशात पाठवले जात आहेत. हे सर्व सूर्याच्या विविध भागांचा अभ्यास करून इस्रोला अहवाल देतील, जेणेकरून शास्त्रज्ञ भविष्यातील रणनीतीवर काम करू शकतील. सूर्यमालेच्या वरच्या वातावरणातील गतिशीलता शोधणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. या अभ्यासामुळे सूर्याच्या कोरोनामधील उष्णतेशी संबंधित रहस्य समजण्यास मदत होईल. अवकाशात हवामानातील बदल सहज कळू शकतात. सूर्याची उष्णता समजून या मोहिमेसाठी महत्त्वाची भूमिका निश्चित करण्यात आली आहे. सूर्याचा विस्तार, प्रभाव आणि गतिशीलता समजून घेणे हा या मोहिमेचा एक महत्त्वाचा उद्देश आहे.

आदित्य-L1 ही भारताची पहिली सौर मोहीम आहे, जरी आपण जगाबद्दल बोललो तर, सूर्याविषयी महत्त्वाची माहिती गोळा करण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न केले गेले आहेत. युरोपियन स्पेस एजन्सीने सर्वाधिक प्रयत्न केले आहेत, ज्याने आतापर्यंत २२ मोहिमा पाठवल्या आहेत. याशिवाय NASA ने देखील अनेकवेळा हा प्रयत्न केला आहे, NASA ने १९६० मध्येच आपले पहिले सोलर मिशन लाँच केले होते. नासाच्या १४ पैकी १२ सौर मोहिमा अजूनही सूर्याच्या कक्षेत आहेत.

# 'कोबोट'चा सर्जिकल स्ट्राईक!

आज 'कोबोटिक्स'ची वेगवान भरभराट रोबोटीक्स क्षेत्राला मागे टाकत सुरू आहे याची कल्पनादेखील भल्याभल्यांना नाही. यंत्रमानव म्हणजे रोबोट हे वास्तवात उतरण्याच्या कितीतरी आधी मानवी कल्पनेत साकारत होते. कोबोटमध्ये आता राग-द्वेष-लोभ-मत्सर-प्रेम या भावनांच्या आगाराचा उदय होत आहे. मात्र याआधीही विविध कथानकातून जीवन सुलभ करण्यासाठी जसे रोबोट आकारले तसेच रोबोट हे क्रुरकर्मा ठरणार हे देखील कथांमधून सर्वसामान्यांना जाणवत होते. इंग्रजी चित्रपटात यंत्र आणि माणूस यांचे युद्ध आपण पाहिले आहे. आजच्या पालकांना-विद्यार्थ्यांना कोबोटिक्स माहीत हवे. इंटरनेटवर कोबोटची विक्री होते आहे. तसेच तंत्रज्ञान शिकवणार्या प्राध्यापकांनीही आपल्या अस्तित्वाच्या लढाईत विजयी होण्यासाठी आपल्यावर 'कोबोट'चा होणारा 'सर्जिकल स्ट्राईक' समजून घ्यायलाच हवा!

– प्रा. किरणकुमार जोहरे

टेक्नोलॉजीची गंगा जीवनामृत आहे, मात्र याचा अतिवापर झाला तर टेक्नोलॉजीचा महापूर हा मानवजातीला विध्वंसाच्या कोणत्याही थराला नेऊ शकतो हे सत्य समजून घ्यायला हवे. आज आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) च्या मदतीने रोबोटची शक्ती कित्येक पटीने वाढली असून अखंडित काम करणारा सांगकाम्या न राहता रोबोट आता विचारी बनले आहेत. रोबोटची जागा आता जागोजागी कोबोट घेत आहेत. अशावेळी प्रश्न पडतो काय आहे कोबोट? तर कोबोट म्हणजे 'कोलॅबरेटिव्ह रोबोट' म्हणजेच सहयोगी यंत्रमानवाचे नवे रूप असलेली अद्ययावत यंत्रणा!

इलेक्ट्रॉनिक्स एक्झिक्युटिव्ह डिसिजन सपोर्ट सिस्टीम आणि सेल्फ लर्निंग ॲबिलीटी असणारे कोबोट कामचुकार माणसांची जागा घेत आहेत. कॉम्प्युटर क्षेत्रात काम करणार्या लाखो लोकांच्या नोकर्या एका झटक्यात चॅटजीपीटीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाने गिळंकृत केल्यात. आता कॉम्प्युटर प्रोग्रामिंग शिकण्यासाठी लाखो रूपये फी भरून घरी बसण्याची वेळ कॉम्प्युटर इंजिनियरवर जगभरात येत आहे ही एक वास्तव बाजू आहे. मात्र असे असले तरी हा बदल सॉफ्टवेअर क्षेत्रात जास्त विध्वंस करीत असतानाच जगभरात अचानक इलेक्ट्रॉनिक्सला मागणी वाढली आहे.



जगभरातील एकंदर नोकर्यांचा ताळेबंद पडताळणी केली तर अगदी स्पष्ट लक्षात येत की पृथ्वीवर एकंदर जेवढ्या तंत्रज्ञान क्षेत्रातील नोकर्या आहेत, त्यात एकट्या इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानाशी जोडल्या गेलेल्या नोकर्यांची संख्या २१ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जगभरातील श्रीमंत लोकांची यादी पाहिली तर असे लक्षात येते पृथ्वीवर इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान हे असे क्षेत्र आहे की जिथे रोजगारांसह श्रीमंतीचीदेखील ढगफुटी होत आहे.

इलेक्ट्रॉनिक्सचा भाग असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे एआयमुळे जगभरातील लाखो लोकांच्या नोकर्या गेल्यात ही गोष्ट खरी असली तरी नवनवीन संधींची निर्मितीदेखील होत आहे हे वास्तव इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राबाहेरील काम करणारे लोकही नाकारू शकत नाही. अद्यापही रोबोट बनविणारे कोबोट यंत्रणा बनविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान अवगत असणार्या 'टेक्नोलॉजी वॉरीअर्स' ची जगभर डिमांड ही उत्तरोत्तर वाढत आहे.

**कोबोट म्हणजे काय?**

रोबोट म्हणजे यंत्रमानवाचे प्रगतरूप म्हणजे कोबॉट्स म्हणजे सहयोगी यंत्रमानव होय. कोबोट हे विविध सेन्सरचा वापर करून आजूबाजूच्या परिस्थितीवर निर्णय घेतात आणि आवश्यकतेनुसार मानवांशी संवाददेखील साधतात. पारंपरिक रोबोट हे एकाकीपणे सांगकाम्या डिझाइन असते, तर कोबॉट्स विशेषतः मानवांसोबत काम करण्यासाठी, कार्यांमध्ये सहयोग करण्यासाठी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तयार केले जातात.

**असे काम करतात कोबोट**

कोबोट आणि रोबोट हे म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स आणि मॅकेनिकल पार्टस यांचा एकत्रित मिलाफ होय. एकंदर रोबोटिक्स टेक्नोलॉजी हे मॅकेनिकल म्हणजे यांत्रिक प्रणाली, विविध प्रकारचे सेन्सर्स इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर आणि कॉम्प्युटर सॉफ्टवेअर एकत्र करून एम्बेडेड सिस्टिमचे मशीन होय. रोबोटला काय आणि कसे काम करायचे याच्या सीमारेषा मनुष्य आखून देतो. यामुळेच रोबोट हे फुल्ली आणि सेमी ॲटोमॅटिक अशा दोन वेगवेगळ्या वर्गात काम करू शकतात. मात्र कोबोट असो की रोबोट तो चालवण्यासाठी ऊर्जा म्हणजे बॅटरीची गरज असते. सोलर एनर्जीवर काम करणारे कोबोट असले तरी बॅटरी संपली की कोबोट फक्त 'डेडबॉडी' ठरते हे लक्षात घ्यायला हवे.

**कल्पनेतला कोबोट वास्तवात!**

कल्पनेतला कोबोटचा खरा प्रवास समजून घेण्यासाठी रोबोटचा वास्तवाकडे झालेला रंजक प्रवास समजून घ्यायला हवा. १९२१ साली 'रॉसमसमधील युनिव्हर्सल रोबोट्स' हा शब्द प्रयोग झेकचे लेखक केरेल कॅपॅक यांनी केला आणि आपल्या कथानकात एक यंत्रमानव माणसाला ठार करतो हा विचारच जनमानसाला धक्का देणारा होता. मात्र डिजिटल आणि प्रोग्रामयोग्य रोबोटचा शोध लावण्यासाठी १९९४ साल उजाडले आणि जॉर्ज डेव्होल यांनी बनविलेला आधुनिक यंत्रमानव येताच रोबोटिक्स उद्योगाची अक्षरशः घोडदौड सुरू झाली.

ग्रीक संस्कृतीच्या विविध कलाकृती या स्वयंचलीत यंत्रणांनी सुसज्ज असल्याचे प्रमाण अगदी पिरॅमिडच्या रचनेपासून इतरही अनेक रचनांमध्ये जगभर आढळतात. इसवीसनाच्या पूर्वी २७० ग्रीक इंजिनिअर क्टेसीबायस यांनी स्वयंचलीत यंत्रणा म्हणजे पाण्याच्या घड्याळाची निर्मिती केली. वाफेच्या शक्तीवर चालणारा तांत्रिक पक्षी ग्रीक गणितज्ञ आर्किटास ऑफ टॅरन्टम यांनी बनवीला होता. चीनमध्ये यंत्र मानवाची आकृती बनविली असल्याचा उल्लेख झुऊच्या किंग म्यूच्या लिखाणामध्ये आढळतो. १९२७ साली रिलिज झालेल्या 'मेट्रोपोलिस' या चित्रपटात 'हायनोयॉइड रोबोट'चे अवाक करणारे कारनामे जनतेने पाहिले.

१९४१ साली हायफाय लेखक आणि भविष्यवेत्ता आयझॅक असिमोव यांनी रोबोट तंत्रज्ञानाचे वर्णन करण्यासाठी 'रोबोटिक्स' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम केला आणि नजिकच्या भविष्यात उदयाला येणार्या रोबोट इंडस्ट्रीचे परिणामदेखील अधोरेखित केलेत.

**असा जन्माला कोबोट!**

पहिल्या कोबोटचा शोध १९९६ साली जे. एडवर्ड कोलगेट आणि मायकेल पेश्किन यांनी लावला. त्यांच्या मते कोबोट हे 'व्यक्ती आणि संगणक-नियंत्रित मॅनिप्युलेटर' यांच्यातील थेट व प्रत्यक्ष परस्परसंवादासाठी बनवलेल्या उपकरणाची कार्यपद्धत होय.

कोबॉट्स (सहयोगी यंत्रमानव) आणि रोबोटस हे मानवांशी परस्परसंवाद करताना वेगवेगळ्या प्रकारे ऑपरेट होतात. पारंपरिक यंत्रमानव एकाकीपणे काम करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत, तर कोबॉट्स विशेषतः मानवांसोबत काम करण्यासाठी, कार्यांमध्ये सहयोग करण्यासाठी आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तयार केले आहेत.

**एआय कोबोट!**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कोबोटिक्समध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असे म्हणण्यापेक्षा आर्टिफिशियल इंटेलिजन्सने क्रांतीकारी चक्रीवादळ निर्माण केले आहे. कोबोट हे असे रोबोट्स आहेत जे आजूबाजूच्या वातावरणाचे आकलन करीत निर्णय घेण्यास आणि अनुभवातून शिकण्यास सक्षम असतात. कोबोट शक्तीमान बनतात, कारण मशीन लर्निंगसारखे एआय अल्गोरिदम आणि कॉम्प्युटर व्हिजन रोबोट्सना किचकट, सातत्याने बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास आणि जटिल कार्ये कार्यक्षमतेने करण्यास मदत करतात.

**कोबोटचा उपयोग कुठे होतो?**

इंडस्ट्रीत उत्पादन, आरोग्यसेवा, कृषी, अवकाश संशोधन, अणुभट्टी, लॉजिस्टिक, मनोरंजन, हॉटेल, विमानतळ, पत्रकारिता व मांस मीडिया, शाळा-महाविद्यालयात शिकविणारे 'ज्ञानगुरू' असे कोबोट विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. कोबोटिक्सचा वापर औद्योगिक ऑटोमेशन, आरोग्यसेवा, हवामानाची अचूक माहिती देणे, आपत्ती व्यवस्थापन, कृषी क्षेत्र, अर्थशास्त्र, बांधकाम, एरोस्पेस आणि अगदी जगभरातील विविध देशांतील लोक आपल्या घरांमध्ये व्हॅक्यूमिंग म्हणजे झाडूपोछा, भांडी स्वच्छता आणि लॉन कापणीसारख्या कामांसाठी कोबोटचा वापर जगभर केला जातो आहे. कामगारांच्या टंचाईवर कोबोट कामगार हा रामबाण उपाय ठरत असून भाडेतत्त्वावर कोबोट उपलब्ध करून दिले जातील अशा जाहिराती लोक देत आहेत हे विशेष आहे. याशिवाय युद्धात लढाईसाठी जाऊ शकतील असे कोबोट सैन्य सीमारेषेवर तैनात होते आहेत.

इंटरनेटवर कोबोटची विक्री होते आहे. बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात न करता डिंग्या हाकणार्या, बहानेबाजी, टीका करणे आणि लंगड्या सबबी सांगत फाजिल आत्मविश्वास बाळगत सेवानिवृत्तीची दिवास्वप्ने पाहणार्या टेक्नोलॉजी फोबिक लोकांनी ही गोष्ट समजून घ्यायला हवी की आपल्या अरमानांवर 'सर्जिकल स्ट्राईक' करण्यासाठी कोबोटची फौज सज्ज झाली आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## जिऱ्याच्या पाण्याचे फायदे




जेवण्यात चव वाढवण्यासाठी जिर्याचा वापर केला जातो पण हेच जिरं आम्हाला बर्याच आजारांपासून दूर ठेवतो. आज आम्ही तुम्हाला सांगत आहो की जिर्याचे पाणी कशा प्रकारे लाभदायक असते.

जिरेचे पाणी कसे बनवायचे

दोन ग्लास पाणी घेऊन गॅसवर ठेवा

यानंतर त्यात १ चमचा जिरे घाला.

पाणी अर्धा होईपर्यंत उकळा, म्हणजे १ ग्लास

त्यानंतर पाणी गाळून प्या

ॲनिमियाशी बचाव करेल – जिर्याचे पाणी रक्तात हिमोग्लोबिन वाढवत, कारण जिर्यात आयरनची मात्रा जास्त असते.

बेबीमध्ये जन्मदोषाचा धोका कमी करतो – प्रेगनेंट महिलांना जिर्याचे पाणी रोज प्यायला पाहिजे, ज्याने बेबीमध्ये जन्मदोष होण्याची शक्यता कमी होते.

ब्लड प्रेशर नॉर्मल ठेवतो – जिर्यात पोटॅशियमची उत्तम मात्रा असते, जे ब्लड प्रेशरला नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

इम्यूनिटी वाढवते – यात आयरन असतं, जे इम्युनिटी वाढवतो. त्या शिवाय व्हिटॅमिन अं, सी आणि एंटीऑक्सीडेंटची मात्रा देखील असते, जी शरीरात ऊर्जा भरते.

ॲसिडिटी दूर करते – प्रेग्नेंसी दरम्यान महिलांना ॲसिडिटीचा त्रास जास्त प्रमाणात होतो, पण या दिवसांमध्ये जिर्याच्या पाण्याचे सेवन केले तर हा त्रास बर्याच प्रमाणात कमी होतो.

## तुम्ही सकाळी उठल्यानंतर कॉफी पिता? तर आधी हे वाचा

आपल्यापैकी बहुतांशजण दिवसाची सुरुवात गरम पाणी पितात. तर काही लोक लिंबू पाणी पितात. अथवा काहीजण एक्सरसाइज करतात. मात्र यामध्ये सर्वात सामान्य गोष्ट म्हणजे सकाळी उठल्यानंतर बहुतांशजण एनर्जीसाठी कॉफी पितात. काही लोकांचे असे मानणे असते की, जो पर्यंत कॅफेनचे सेवन करत नाही तो पर्यंत त्याचा दिवस सुरु होत नाही.



मात्र एक्सपर्ट्सच्या मते, तुम्ही उठल्यानंतर एक तास तरी कॉफीचे सेवन करू नका. तुम्हाला वाटत असेल की, कॉफीमुळे तुम्हाला उर्जा मिळते किंवा झोप उडते तर कॉफी प्यायल्याने त्याचा विरुद्ध परिणाम होऊ शकतो.

काय म्हणतात एक्सपर्ट्स

दिवसा आपला मेंदू एडेनोसिन नावाचे एक रसायन उत्पादन करते, जे झोपण्यास प्रोत्साहन देतात. जसे–जसे तुम्ही दीर्घकाळ जागे राहता तेव्हा हे रसायन वाढले जाते आणि तुम्हाला झोप येते असे जागणवण्यास मदत करते.

**कॉफी पिण्याची योग्य वेळ**

कॉफी पिण्याच्या योग्य वेळेबद्दल जेव्हा बोलले जाते तेव्हा सकाळी उठल्यानंतर कॉफी पिऊ नये. कारण जेव्हा आपण झोपेतून उठतो तेव्हा कोर्टिसोलचा स्तर उच्च असतो. त्यामुळे कोर्टिसोलचा स्तर आधीपासूनच अधिक असेल तर कॅफेन याच्या विरोधात काम करते. एक्सपर्ट्स कॉफी दुपारी २ नंतर पिण्याचा सल्ला देतात.

## पावसाळ्यात तुम्हीही मासे खात असाल तर तोटे जाणून घ्या

पावसाळयात आहाराची विशेष काळजी घ्यावी कारण पावसाळ्यात बॅक्टेरिया लवकर वाढतात, त्यामुळे आजारांचा धोका जास्त असतो. तसेच पावसाळ्यात मांसाहार टाळण्याचा सल्ला दिला जातो. जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्याने पोटाशी संबंधित अनेक आजार होऊ शकतात. याशिवाय सीफूड खाणेही टाळावे. चला तर मग जाणून घेऊया पावसाळ्यात सीफूड का खाऊ नये.



जल प्रदूषण : पावसाळ्यात तलावांचे पाणी बहुतेकदा दूषित आणि घाण होते, कारण रस्ते आणि नाल्यांचे पाणी अनेकदा तलावांमध्ये जाते. त्यामुळे माशासारखे पाण्यात राहणारे प्राणी जर तुम्ही या ऋतूत खाल्ले तर तुम्हाला पोटाशी संबंधित आजारांचा धोका वाढतो.

पावसाळा हा प्रजनन काळ : पावसाळ्यात मासे प्रजनन करतात म्हणजेच हा हंगाम माशांचा प्रजनन हंगाम असतो. जे त्यांच्या सेवनामुळे अन्न विषबाधा देखील होऊ शकते. यासोबतच या दिवसात रोग प्रतिकारशक्ती कमकुवत असल्यामुळे अनेक आजार होऊ शकतात.

ॲलर्जी : पावसाळयात रोगप्रतिकारक शक्तीची विशेष काळजी घ्यावी. ज्यामुळे तुम्ही अनेक मौसमी आजारांपासून दूर राहू शकता. ज्या लोकांना ॲलर्जीच्या तक्रारी आहेत, त्यांना सी–फूडची ॲलर्जी होण्याची शक्यता जास्त असते. पोळ्या, खाज, पोटदुखी, सूज यासारख्या समस्या पावसाळ्यात होऊ शकतात.

विषबाधा : या दिवसात सीफूडमधील खाल्ल्याने न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात. विशेषत: गरोदर महिला आणि लहान मुलांना हा त्रास जास्त होतो.

इतर प्रदूषण : पावसाळ्यात इतर प्रदूषण देखील वाढते. उदाहरणार्थ सीफूड पॉलीक्लोरिनेटेड बायफेनिल्स (पीसीबी) ने देखील दूषित होऊ शकते, जे माशांच्या ऊतींमध्ये जमा होऊ शकते. हे मानवांसाठी अत्यंत घातक ठरू शकते.

## गुटगुटीत बाळासाठी बनवा होममेड सेरेलॅक

सगळ्यांना नेहमी वाटते आपले बाळ निरोगी आणि गुटगुटीत असावे. यासाठी प्रत्येक आई तिच्या बाळासाठी अनेक प्रयन्त करत असते. अशातच बरेचदा डॉक्टरांच्या सल्ल्याने बाजारातील सेरेलॅकही सुरू करण्यात येते. पण यापेक्षा घरीच बाळाला आईने पौष्टिक सेरेलॅक बनवून देणे अधिक फायदेशीर ठरते. साधारण ६ महिन्यानंतर बाळाला योग्य असा आहार सुरू करण्यात येतो.



सेरेलॅक म्हणजे बाळाच्या आरोग्याला देण्यात येणारा पौष्टिक आहार. धान्य, तृणधान्य आणि कडधान्य, नट्स या सर्वांचे मिश्रण करून बाळासाठी एक लापशी तयार करण्यात येते ज्याला सेरेलॅक असे म्हटले जाते. शरीराला आवश्यक पोषण असणारे सर्व पदार्थ यामध्ये समाविष्ट करण्यात येतात आणि बाळाचे आरोग्य यामुळे चांगले राहून प्रतिकारशक्ती वाढते. सेरेलॅक वेगवेगळ्या पद्धतीने आणि वेगवेगळ्या पदार्थांनी बनविण्यात येते. यामध्ये गहू, दलिया, बदाम, काजू, तांदूळ, साबुदाणा, मसूर डाळ या पदार्थांचा समावेश करण्यात येतो.

सेरेलॅक बनविण्यासाठी साहित्य

इंद्रायणी तांदूळ, मूग डाळ, उडदाची डाळ, बदाम, जिरे, ओवा, साजूक तूप.

असे बनवा बाळांसाठी घरच्या घरी सेरेलॅक

वर दिलेले सर्व साहित्य एका भांड्यात व्यवस्थित २–३ वेळा धुवा आणि त्यात कोणताही खडा राहणार नाही हे पाहा.

त्यानंतर चाळणीमध्ये हे पाणी निथळण्यासाठी १५–२० मिनिट्स ठेवा.

पाणी निथळल्यावर सुती कपडच्यावर पसरवून सुकविण्यासाठी ठेवा.

अर्धा – १ तास झाल्यावर हे सर्व तुम्ही एका कढईत मंद आचेवर भाजून घ्या.

मूगडाळ, तूरडाळ, उडीद सर्व डाळी पण तुम्ही मिक्स करू शकता.

थोडं थंड झाल्यावर मिक्सरमधून याची पावडर करून घ्या.

पिठाच्या चाळणीने ही पावडर व्यवस्थित चाळून घ्या. जाडसर ठेऊ नका.

हवाबंद डब्यात २–३ महिने ठेवल्यास सहज टिकते.

## हार्ट अटॅक आणि पॅनिक अटॅक मध्ये 'हा' आहे फरक

आजकाल बदलत्या आणि बिघडलेल्या लाइफस्टाइलमुळे लोकांना विविध आजार होत आहेत. गेल्या काही वर्षांपासून हार्ट अटॅकच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. यापूर्वी वयस्कर लोकांमध्ये हार्ट अटॅकची समस्या दिसून यायची. मात्र आता लहान मुलांमध्ये सुद्धा हार्ट अटॅक येण्याचे प्रमाण वाढले आहे. याचसोबत पॅनिक अटॅकची समस्या ही वाढली गेली आहे.


एक्सपर्ट्सच्या मते, जेवढा धोकादायक हार्ट अटॅक आहे तेवढाच पॅनिक अटॅक सुद्धा. काही वेळेस लोकांना हार्ट ॲटक आणि पॅनिक अटॅक हा एकच असल्याचे वाटचे. त्याच कारणास्तव रुग्णाला कळत नाही त्याच्यासोबत नक्की काय होत आहे. जर तुम्हाला या दोघांमधील फरक माहिती नाही तर याच बद्दल आपण अधिक जाणून घेऊयात.

**हार्ट अटॅक म्हणजे काय?**

जेव्हा व्यक्तीच्या रक्तात पोहचवणाऱ्या धमन्यांमध्ये बाधा येत असेल किंवा धमन्या १०० टक्के ब्लॉक होतात त्या स्थितीत व्यक्तीला हार्ट अटॅक येतो. हार्ट अटॅक येण्यापूर्वी काही लक्षण व्यक्तीमध्ये दिसून येतात. त्यामध्ये छातीत दुखणे, छाती जड होणे अशी काही सामान्य लक्षणे आहेत. या व्यतिरिक्त श्र्वास फुलणे, घाम येणे किंवा उलटी येणे ही त्याची काही सामान्य लक्षणे आहेत. ही लक्षणं लगेच किंवा काही तासांनी दिसतात.

**पॅनिक अटॅक म्हणजे काय?**

एक्सपर्ट्सच्या मते, पॅनिक ॲटक एक प्रकारची एंग्जायटी म्हणजेच चिंतेची स्थिती. जी गंभीर होण्यासह अचानक विकसित होते. पॅनिक अटॅक दरम्यान हृदयाचे ठोके वाढले जातात, श्र्वास फुलला जातो, डोके दुखणे आणि शरिर थरथरणे अशा समस्या होतात.



**हार्ट अटॅक आणि पॅनिक अटॅक मधील सामान्य लक्षणे**

रिपोर्टनुसार, ब्रिटेनच्या हेल्थ एक्सपर्ट्स असे म्हणतात हार्ट अटॅक आणि पॅनिक ॲटक दोघांमध्ये छातीत दुखणे, श्र्वास घेण्यास समस्या आणि घाम येणे अशी सामान्य लक्षणे दिसून येतात.

**हार्ट अटॅक आणि पॅनिक अटॅक मधील फरक काय?**

पॅनिक अटॅक कधीही येऊ शकतो. तुम्ही आराम करत असाल किंवा झोपत असाल तरीही अशी समस्या येऊ शकते. हार्ट अटॅक तेव्हा येतो जेव्हा तुम्ही अधिक काम करत असाल आणि हार्ट अटॅक छातीपर्यंत राहत नाही तर काही लोकांना हात आणि मानेपर्यंत पोहचतो.

## अन्नातून होणारी विषबाधा कशी टाळावी?

पेशाने वकील असलेले बिल मार्लर हे गेल्या ३० वर्षांपासून अन्नात करण्यात येत असलेली भेसळ आणि विषबाधा यांच्याविरुद्ध लढत आहेत. दूषित अन्न ग्रहण केल्यामुळे जडणारे विकार जसं की ई. कोलाई, सॅलमोनेला, लिस्टेरिया आणि इतर विषबाधा यांच्याबाबत सातत्याने जनजागृती करण्याचं कार्य मार्लर हे कित्येक अविरतपणे करत आहेत. नुकतेच नेटफ्लिक्सवर खाद्यपदार्थांमधून होणाऱ्या विषबाधेसंदर्भात 'पॉईझन्ड : द डर्टी ट्रूथ अबाऊट युअर फुड' नामक एक माहितीपट (डॉक्युमेंट्री) प्रदर्शित करण्यात आली आहे. या माहितीपटात बिल मार्लर यांनी महत्त्वाची भूमिका केली आहे.

बीबीसीशी केलेल्या चर्चेत बिल यांनी अन्नातून होणाऱ्या विषबाधा टाळण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपायांबाबत अत्यंत उपयुक्त माहिती सर्वांना दिली. मार्लर यांच्याप्रमाणेच पॉईझन्ड या माहितीपटात १७ वर्षीय स्टेफनी इनबर्ग हिची महत्त्वाची भूमिका आहे. स्टेफनी ही अमेरिकेतील सेंट लुईस येथील रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी ती आपल्या कुटुंबीयांसोबत डॉमिनिकन रिपब्लिक येथे पर्यटनासाठी गेली होती. प्रवासाला निघतानाच स्टेफनीच्या पोटात दुखत होतं. पण त्याकडे दुर्लक्ष करून ती विमानाने डॉमिनिक रिपब्लिकच्या दिशेने रवाना झाली. तिथे पोहोचेपर्यंत तिची पोटदुखी आणखीनच वाढली. रात्रीपर्यंत या पोटदुखीमुळे तिला रुग्णालयात दाखल करावं लागलं. दुसऱ्या दिवशी स्टेफनी उठली. पण ती आपल्या आईलाही ओळखू शकत नव्हती.

तिच्या मूत्रपिंडांनी (किडनी) काम करण्याचं थांबवलं होतं, तर मेंदूला सूज येऊन त्याचा परिणाम तिच्या संपूर्ण शरीरावर दिसून येत होता. तिची परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचं लक्षात आल्यानंतर स्टेफनीच्या कुटुंबीयांनी तत्काळ आपला पर्यटनाचा प्लॅन रद्द केला. ते थेट अमेरिकेला आपल्या घरी परतले. जवळच्या रुग्णालयात स्टेफनीला दाखल करण्यात आलं. स्टेफनीला ई. कोलाई नामक बॅक्टेरियल इन्फेक्शन झाल्याचं निदान डॉक्टरांनी केलं. स्टेफनीवर उपचार सुरू करण्यात आले. पण तिची प्रकृती वरचेवर बिघडतच चालली होती. मृत्यूशी झुंजत असलेल्या अवस्थेतच स्टेफनीने आपल्यावर ओढवलेल्या या परिस्थितीविषयी डॉक्युमेंट्रीमध्ये माहिती दिली आहे. पुरेशी स्वच्छता न राखल्यास तुमची भूक भागवणारं चवदार जेवण तुमच्यासाठी कसं विष बनू शकतं, हे समजून घेण्यासाठी स्टेफनीचं एकमेव उदाहरण पुरेसं आहे. डॉक्युमेंट्रीमध्ये बोलताना स्टेफनी म्हणते, माझ्या किडनी अत्यंत कमकुवत बनल्या आहेत. त्यांचं काम योग्यरित्या चालावं यासाठी मला औषधांवर अवलंबून राहावं लागत आहे. काही दिवसांतच किडनी पूर्ण पूर्णपणे निकामी झाले आहेत. भविष्यात माझ्या किडनीचं ट्रान्सप्लांटही करून घ्यावं लागू शकतं. किंवा आयुष्यभर डायलेसिसचे उपचार तरी मला करून घ्यावे लागतील. विषबाधा कुठून झाली, या प्रश्र्नाचं उत्तर देताना स्टेफनी म्हणते, मी त्यावेळी सलाड खाल्लं होतं. स्टेफनीप्रमाणेच दरवर्षी तब्बल ६ कोटी लोक दूषित अन्न खाल्ल्यामुळे गंभीररित्या आजारी पडतात. त्यापैकी सरासरी ४ लाख २० हजार लोकांचा दरवर्षी विषबाधेमुळे मृत्यू होतो. बिल मार्लर यांच्या मते, तुम्ही जे अन्न खाता त्याचं निरीक्षण करणं, त्याबाबत जागृत असणं तुमचं जीवन वाचवू शकतं. अन्नातून होणारी विषबाधा टाळण्यासाठी काही काळजी घेणं आवश्यक आहे. कोणते अन्नपदार्थ कसे खावेत, हेसुद्धा महत्त्वाचं असल्याचं मार्लर सांगतात.

**हे कोणते पदार्थ आहेत– कच्चं दूध नकोच**

बिल मार्लर यांनी कच्चं दूध अर्थात अनपाश्र्चराईज्ड दूधाचं सेवन करणं हे टाळायला हवं, असं स्पष्ट शब्दांत सांगितलं. कच्च्या दूधातून ई. कोलाई बॅक्टेरियासारखे संसर्ग होण्याचा धोका वाढतो. कच्चं दूध पिल्यामुळे मिळणाऱ्या फायद्यांबाबत चर्चा होते. पण त्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्याच्या तुलनेत ते अत्यंत कमी आहेत, असं मार्लर यांनी सांगितलं. आपण १९ व्या शतकात लोकांमध्ये पसरणारे आजार विसरून चालणार नाही, असं बिल म्हणाले.

**मोड आलेली कडधान्ये**

साधारपणे, मोड आलेली कडधान्ये ही आरोग्यदायी मानली जातात. मूग, मटकी, वाल आदी कडधान्ये भिजवून रात्रभर ठेवून त्यांना मोड आणून ती खाल्ली जातात. पण बिल यांच्या मते, ही कडधान्ये दूषित असल्यास त्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. खरंतर ओलावा आणि उष्मा यांच्या संपर्कात जीवाणू अतिवेगाने पसरतात.



परिणामी, अनेकदा मोड आलेल्या कडधान्यामध्ये साल्मोनेलासारखे जीवाणूही असतात. २०११ साली मोड आलेली दूषित कडधान्ये खाऊन जर्मनीत ९०० जणांच्या किडनी निकामी झाल्या. त्यापैकी ५० जणांना आपला जीव गमवावा लागला, असं बिल मार्लर म्हणाले. ते म्हणतात, ही कडधान्ये उघड्यावर उगवलेली आणि साठवलेली असतात. तुम्ही ते घरी आणून थेट भिजवून मोड आणण्यासाठी ठेवता. ही प्रक्रियाही उघड्यावरच होते. अशा स्थितीत कडधान्यांवरील बॅक्टेरिया वाढण्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण होते. त्यामुळे अशा प्रकारची कडधान्ये कच्ची, न धुता खाऊ नयेत. ती नीट शिजवूनच असा सल्ला मार्लर देतात. तज्ज्ञांच्या मते, कडधान्यं पाण्यात खूप काळ भिजवून ठेवू नयेत. त्यांना बंद ठिकाणीही बराच काळ ठेवणं योग्य नाहीये. जिथे हवा खेळती असते, अशा ठिकाणी कडधान्यांना मोड आणायला ठेवणं केव्हाही योग्य असतं.

**खिमा उंडे नीट शिजवूनच खा**

खिम्याचे उंडे हा अनेकांच्या आवडीच्या खाद्य प्रकार. साधारपणपणे मटण आपल्याला लाकडी ओंडक्यावर तुकडे करून देण्यात येत असतं. मटणाचा खिमा बनवण्यासाठी मटणाचे तुकडे याच लाकडाच्या ओंडक्यावर बारीक करून दिले जातात. ओंडके अस्वच्छ असल्यास या प्रक्रियेत खिम्यामध्ये बॅक्टेरिया मिसळण्याची शक्यता निर्माण होते. आपण मटण आणल्यावर ते व्यवस्थित धुवू शकतो. पण खिमा बारीक असल्यामुळे तो योग्य रित्या धुता येत नाही. अशा स्थितीत खिमा हा योग्य प्रकारे शिजवणं गरजेचं असतं. अशा प्रकारचा दूषित खिमा हा ई. कोलाई नामक बॅक्टेरियाचं घर असू शकतं. अशा ठिकाणी एखाद्या सुईच्या टोकावर शेकडो मावतील इतक्या संख्येत ई. कोलाईचे बॅक्टेरिया असू शकतात. ई. कोलाई बॅक्टेरिया हा कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूचं कारण ठरण्यासाठी पुरेसा आहे. तो जेवणात असला तरी त्याचा कोणताही विशिष्ट वास किंवा चव नसतो. आपल्या साध्या डोळ्यांनी पाहता येणार नाहीत, इतके ते सूक्ष्म असतात. त्यामुळे, खिमा जर तुम्हाला खायचा असेल, तर तो एकदम व्यवस्थित शिजवून घेणं, हेच सर्वाच सुरक्षित आहे. अशा प्रकारचे बॅक्टेरिया नष्ट करण्यासाठी अन्न किमान ६९ अंश सेल्सियस तापमानावर शिजवणं आवश्यक आहे, अशी माहिती मार्लर यांनी दिली.

**न धुता वापरलेल्या भाज्या**

ताज्या, हिरव्या भाज्या खाण्याचे आरोग्याला अनेक फायदे आहेत, मात्र अनेकदा या भाज्या आजारपण आणि संसर्गाचंही कारण बनू शकतात. डॉ. प्रतिभा लक्ष्मी सांगतात, तुम्ही ज्या भाज्या खात आहात, त्या कोठे उगवतात हे पण खूप महत्त्वाचं आहे. आजकाल शेतीच्या पद्धती खूप बदलल्या आहेत, त्या असुरक्षितही झाल्या आहेत. पीकांवर मोठ्या प्रमाणावर कीटकनाशकं फवारली जातात. त्यामुळे भाज्या आणि फळं मीठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून घेऊन मगच वापरावीत. नाहीतर संसर्ग किंवा ॲलर्जीचा धोका राहतो. डॉक्टर आरएसबी नायडूसुद्धा डॉ. प्रतिभा यांच्या म्हणण्याला दुजोरा देतात. आपण प्रामुख्याने साफ–सफाईबद्दल बोलायला हवं. अनेकदा आपण बातम्या ऐकतो की, पाणीपुरी खाल्ल्यानंतर फूड पॉयझनिंग झालं आणि त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागलं. याचं सगळ्यांत मोठं कारण हे स्वच्छता नसणं आहे. पदार्थ बनवणारे वापरल्या जाणाऱ्या भाज्या नीट साफ करत नसावेत किंवा जिथे ते या भाज्या शिजवतात, ती जागा स्वच्छ नसावी, असंही डॉ. आरएसबी नायडू सांगतात. कच्च्या भाज्यांमध्ये ई. कोलाई, साल्मोनेला आणि लिस्टेरियासारखे जीवाणू असतात. भाज्या शेतातून स्वयंपाकघरापर्यंत पोहोचण्याच्या प्रवासात त्यांच्यामध्ये जीवाणूंची वाढ होण्याचा धोकाही वाढतो. अनेकदा हिरव्या भाज्या स्वयंपाकघरातील अस्वच्छतेमुळेही संक्रमित होतात. त्यामुळे कच्च्या भाज्या नीट स्वच्छ करून, धुवूनच वापरायला हव्यात.

**कच्ची अंडी**

कच्च्या अंड्यामध्ये साल्मोनेला बॅक्टेरिया असतात. अंड जोपर्यंत अखंड आहे, त्याच्या कवचाला कोणताही तडा गेलेला नाहीये, तोपर्यंत हे जीवाणू अंड्यात राहू शकतात. म्हणूनच तज्ज्ञ अंडी उकडून खाण्याचा सल्ला देतात. CDC नुसार अंड्यातला पांढरा भाग आणि पिवळं बलक दोन्ही नीट घट्ट होत नाही, तोपर्यंत अंडी उकडून घ्यायला हवीत. अंडी फ्रीजमध्ये ठेवतानाही फ्रीजचं तापमान अंड्यांच्या हिशोबाने सेट करायला हवं. शक्य असेल तर ताजीच अंडी वापरावीत. आहारतज्ज्ञ नीता दिलीप सांगतात की, अनेक दिवसांपर्यंत ठेवलेली अंडी फुटतात. अशी अंडी खाल्ल्यामुळे अनेक पद्धतीचे संसर्ग होऊ शकतात. त्यामुळे अंडी खरेदी करताना त्यावरची तारीख पाहणं आणि शक्यतो ताजी अंडीच वापरणं हे अधिक उत्तम आहे.

**मासे, समुद्री अन्नपदार्थ कधीच कच्चे खाऊ नका**

कच्च्या माशांमध्ये जीवाणूंसोबतच अनेक विषाणूही असतात. त्यामुळे जर मासा कच्चा खाल्ला तर अनेक आजार होण्याचा किंवा अगदी प्राणावर बेतण्याचा धोका असतो. त्यामुळे अमेरिकेतील सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशनच्या (CDC) सल्ल्यानुसार, मासे नीट स्वच्छ करून आणि शिजवूनच खायला हवेत. प्रॉन्सबद्दलही CDC असाच सल्ला देते. ते सांगतात की, 'प्रदूषित पाण्यामध्ये वाढणाऱ्या प्रॉन्समध्ये नोरोव्हायरस असतात. त्यामुळे प्रॉन्स धुवून तोपर्यंत शिजवायला हवेत, जोपर्यंत त्यांचा कच्चा वास निघून जात नाही. डॉक्टर प्रतिभा लक्ष्मी सांगतात, मासे खरेदी करताना ते कुठून पकडले आहेत याची चौकशी शक्य झाल्यास करावी. त्या पुढे सांगतात, आजकाल प्रदूषित पाण्यात मत्स्यशेती केली जाते. असे मासे खाल्यामुळे संसर्ग होऊ शकतो. कच्चे मासे कधीही खाऊ नयेत. हीच गोष्ट माशांपासून बनलेल्या औषधांनाही लागू होते. मत्स्यपालन कसं केलं जातं? त्यांना पकडताना साफ–सफाईची किती काळजी घेतली जाईल? या गोष्टींचा विचार करायला हवा. हीच खबरदारी इतर समुद्री अन्नपदार्थ जसे की गोगलगाय, शिंपले आणि खेकडे खातानाही घेतली पाहिजे. हे खाताना सर्वप्रथम ते स्वच्छ धुणे आणि नंतर व्यवस्थित शिजवणे या टप्प्यांमधून गेल्याशिवाय ते कधीच खाऊ नयेत.

**पॅकेज्ड सँडविच**

पॅकेज्ड सँडविच खाण्याआधी त्यावरची तारीख तपासण्याची सवय आपण लावून घ्यायला हवी. पॅकेज्डपेक्षाही ताजं आपल्यासमोर बनवलेलं सँडविच खाणं कधीही चांगलं, असं बिल मार्लर यांनी म्हटलं. अनेक दिवसांपूर्वी बनवलेलं सँडविच खाल्लास तुम्हाला लिस्टेरिया बॅक्टेरियाचा संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे विविध प्रकारच्या आजारांना आमंत्रण मिळतं. बिल यांच्या मते, जगभरात अशा प्रकारचं शिळं सँडविच खाऊन अनेकांचा मृत्यू होतो. किंवा त्यांना रुग्णालयात तरी दाखल व्हावं लागतं. लिस्टेरिया नामक बॅक्टेरिया फ्रिजमध्येही टिकून राहतो. त्यामुळे सँडविच फ्रिजमध्येही साठवलेला असला तरी ते शिळं कधीच खाऊ नये, असं मार्लर यांनी सांगितलं.

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शुक्रवार १८ ऑगस्ट २०२३


## उद्या लातुरात 'गौरव मातृत्वाचा' कार्यक्रम

लातूर : येथीलजीवन कला मंडळ व पूर्णवादी नारी फोरमच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २० ऑगस्ट २०२३ रोजी लातूर शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील पहिल्या महिला म्हणून यशस्वी झालेल्या, यशाच्या उत्तुंग शिखरावर विराजमान झालेल्या महिलांचा सन्मान ' गौरव मातृत्वाचा' या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात येणार आहे. वर्ष २०२३ हे पूर्णवादाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. या वर्षात प. पू. रामचंद्र महाराज व प. पू. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या कृपाशिर्वादाने लातूर शहरात 'सति सौभाग्यवती मनकर्णिका माता' यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत आहे. त्याचाच एक सामाजिक भाग म्हणून रविवारी सायंकाळी सहा वाजता स्वानंद हॉल, रिंग रोड, वाडा हॉटेल जवळ लातूर याठिकाणी ' गौरव मातृत्वाचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## गरजू विद्यार्थ्यांना ७६ सायकलींचे वाटप

लातूर : लातूरच्या आदर्श मैत्री फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे अनुकरण राज्यातील इतरही सामाजिक संघटनानी करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केले. ते आदर्श मैत्री फाउंडेशनच्या वतीने आयोजित सायकल वाटप कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे यांची उपस्थिती होती. तर मंचावर राष्ट्रवादी काँग्रेसचे व्यंकट बेद्रे, प्रशांत पाटील, आदर्श मैत्रीचे अध्यक्ष संतोष बिराजदार, रमेश बिरादार, तुकाराम पाटील, बाबुराव जाधव, ओमप्रकाश झुरुळे, अंकुश नाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवलिंग नागापुरे सर व शुभांगी राऊत यांनी केले. तर आभार ओमप्रकाश झुरळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सायकल बँकचे समन्वयक प्रमोद भोयरेकर, राजेश मित्तल, संतोष बालगीर यांनी परिश्रम घेतले.



## खरीप पिकांचे पंचनामे करून भरपाई द्या; भाजपची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अहमदपूर : अहमदपूर व चाकुर तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाला असून मोठ्या संकटात सापडल्याने खरीप हंगामातील पिकाचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील व माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूरचे तहसीलदार यांच्या फार्मात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना निवेदनाद्वारे शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या एक महिन्या पासून पाऊस पडला नसल्याने चालू खरीप हंगामातील पिके वाळल्याने दुष्काळ सदग्रस्त स्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने शेतकरी हवालदिल झाला आसल्याने सरसकट तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच गत वर्षीच्या महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्ज मुक्ती प्रोत्साहन पर योजने अंतर्गत पन्नास हजार रुपयांचा लाभ अध्याप अनेक शेतकऱ्यांना मिळाला नाही. तोही प्रोत्साहन पर शेतकऱ्यांना पन्नास हजाराचा लाभ देण्यात यावा. गतवर्षीच्या खरीप हंगामातील उत्पादनावरील आधारित पिक विमा अद्याप शेतकऱ्यांना दिला नाही. तोही सरसकट पिक विमा तात्काळ देण्यात यावा अशा काही अहमदपूर व चाकुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भातील निवेदन भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी लातूर यांना तहसीलदार अहमदपूर यांच्या फार्मत निवेदन पाठवण्यात आले आहे. सदरील निवेदनावर भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस त्रंबक आबा गुट्टे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## औसा मतदारसंघातील विविध विकास कामांसाठी ५ कोटींचा निधी मंजूर

औसा : आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे औसा मतदारसंघातील ६५ समाजमंदिर बांधकाम व सुशोभीकरण, दलित वस्तीत अंतर्गत रस्ते तसेच औसा शहरातील तक्षशिला बौद्ध विहार परिसरात अंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत, नाली बांधकाम, सुशोभीकरण काम आदी ६६ कामांसाठी ५ कोटींचा निधी मंजूर झाला असून आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने मतदारसंघातील विकास कामांसाठी भरघोस निधी उपलब्ध होत असून याव्दारे मतदारसंघातील विकासकामे झपाट्याने पुर्ण होत आहेत.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने काही दिवसांपूर्वीच औसा शहरातील तक्षशिला बौद्ध विहार परिसरात ध्यानधारणा केंद्र व संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी १ कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता तर आता तक्षशिला बौद्ध विहार परिसरात अंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत व नाली बांधकाम आणि सुशोभीकरण काम करण्यासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून घेतला असून यासह मतदारसंघातील ६५ समाजमंदिर बांधकाम करणे/ सुशोभीकरण करणे व दलित वस्तीत अंतर्गत रस्ते बांधकाम करणे इ कामांसाठी सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडून ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. भंते सुमेधजी नागसेन भंतेजी यांच्या मार्गदर्शनाखाली औसा मतदारसंघातील सर्व समाजमंदिरांची दुरुस्ती, सुशोभीकरण करून, परिसरात वृक्षलागवड करून तसेच तिथे लाईट व बैठक व्यवस्था करून समाजमंदिरे प्रार्थनास्थळे म्हणून विकसित करण्याचे आमदार अभिमन्यू पवार यांचे व्हिजन आहे. ८० गावातील समाजमंदिरे प्रार्थनास्थळे म्हणून विकसित करण्यासाठी यापूर्वी आमदार अभिमन्यू पवार यांनी ४ कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता, आता पुन्हा उर्वरित गावांसाठी निधी मंजूर करून घेतला आहे.हा निधी मंजूर केल्याबद्दल आ. अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व पालकमंत्री गिरीशजी महाजन यांचे आभार मानले आहेत.

औसा शहरातील तक्षशिला बौद्ध विहार ध्यानधारणा केंद्र व इतर विकासकामांसाठी निधी मिळावी म्हणून येथील समाजबांधवांची गेल्या पंचवीस वर्षापासूनची मागणी होती मात्र यासाठी निधी उपलब्ध होत नव्हता.याबाबत समाजबांधवांनी आमदार अभिमन्यू पवार यांची भेट घेऊन सदरील कामासंदर्भात निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली असता त्यांनी तातडीने तक्षशिला बौद्ध विहार विकासकामांसाठी १ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. याबद्दल समाजबांधवांच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया भाजपचे औसा शहरध्यक्ष लहू कांबळे यांनी दिली आहे.

## श्री संत चुडामणी महाराज यांच्या ४३ व्या पुण्यतिथी निमित्त ४३ जणांचे रक्तदान

अहमदपूर : येथील रायगड मित्र परिवार व श्री संत चुडामणी महाराज विश्वस्त मंडळाच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ४३ रक्तदात्यानी रक्तदान केले.

दि. १७ आगस्ट २०२३ रोजी शहरातील जाज्वल्य असलेल्या श्री संत सदगुरू चुडामणी महाराज यांच्या ४३ व्या पुण्यतिथी निमित्ताने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन रायगड मित्र परिवाराचे गणेश हालसे व दिपक हालसे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात संत चुडामणी महाराजांच्या ४३ भक्तानी रक्तदान केले.

सदरील रक्तदाब शिबिराचे उदघाटन भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील व माजी आमदार बब्रुवान खंदाडे यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी सेवा निवृत्त मुख्याध्यापक देवेंद्र देवणीकर हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपअधीक्षक मणिष कल्याणकर, तहसिलदार शिवाजीराव पालेपाड,नगर परिषदेचे मुख्याधिकारी काकासाहेब डोहीफडे,भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंदराव गिरी, डॉ.पांडूरंग कदम, डॉ.मधुसुदन चेरेकर हे उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमात मराठवाडा सार्वजनिक गणेश मंडळ भोई गल्ली अहमदपुर यांच्या स्थापनेस ५० वर्ष झाल्यामुळे नवीन कार्यकारणीची नुकतीच निवड करण्यात आलेल्या. अध्यक्ष राजु कंधारकर, कार्याध्यक्ष किरण हिवरे, उपाध्यक्ष प्रकाश फुलारी, योगेश राजूरकर,



सचिव रवी भोसले, राजेश अनंतवाळ, सहसचिव गणेश हिवरे, कोषाध्यक्ष किशोर हरणे, सतीश मद्देवाड या सर्व नुतन गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला . तसेच दीनदयाळ बँक अहमदपुर यांना सर्वउत्कृष्ट पुरस्कार मिल्याबद्दल बँकेचे मॅनेजर महेश ताथोडे , मेडिकल असोसिएशनचे नुतन पदाधिकारी संगमेश्वर निला, धनजंय कोत्तावार, समाजसेवक कुमार चव्हाण यांच्या सह विलासराव देशमुख शासकीय रक्तपेढीचे व्यवस्थापक चौधरी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी चुडामणी मंदिर देवस्थान समितीचे पदधिकारी भरत शिरुरकर, शरद जोशी, दयानंद घाटोळ, सुरेश फुलारी, जुगलकिशोर शर्मा, बापूराव शिरुरकर, अंबादास सूर्यवंशी, श्रीकांत भुतडा, श्रीराम जाजु, पांडुरंग पाटील, विजय पाटील, मकरंद जोशी, चंद्रशेखर डांगे, मकरंद जोशी, तुकाराम सांगवीकर, दत्ता पाचंगे, राजू डांगे, विनोद भुतडा, निखिल कासनाळे, किशोर कोरे, अनिकेत काशीकर, गणेश सूर्यवंशी, गणेश हालसे, गिरीश बाहेती, दिनेश बाहेती, निलेश बाहेती, संदीप डांगे, अभि घोगरे, सुदर्शन हालसे दीपक हालसे, सौरभ फुलारी, हेमंत शिंदे सह समस्त रायगड मित्र परिवाराचे सदस्य, संत चुडामणी महाराज मंदिराचे विश्र्वस्त मंडळ,भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

लातूर : येथील जवाहर नवोदय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता इयत्ता सहावीत प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ झाला आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज १७ ऑगस्ट, २०२३ पर्यत भरण्याची मुदत वाढ मिळाली होती. नवोदय विद्यालय समिती, नवी दिल्ली ने ही मुदत वाढवून ती दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ केली आहे. इच्छुक ऑनलाईन अर्ज दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत भरु शकतात . प्रवेश परीक्षा दि.२० जानेवारी, २०२४ रोजी घेण्यात येणार आहे.

ऑनलाईन प्रवेशअर्ज www.navodaya.gov.in या संकेतस्थळावर निशुल्क भरता येतो. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता पाचवी लातूर जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शाळेतून शिक्षण घेत असलेले विद्यार्थी (जन्मतारीख १ मे, २०१२ ते ३१ जुलै, २०१४ (दोन्ही दिवस धरुन) दरम्यान असणारे प्रवेश अर्ज भरण्यास पात्र असतील. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना पाचवीत शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र, विदयार्थ्याचा फोटो, पालकांची व विदयार्थ्याची स्वाक्षरी आधार माहिती तसेच सरकारी अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले रहिवासी प्रमाणपत्र आदि. जेपीजी फॉरमॅटमध्ये १० ते १०० के बी साईजमध्ये अपलोड करण्यासाठी तयार ठेवणे आवश्यक आहे.

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना काही चुका झाल्या असल्यास त्या दुरुस्त करण्याकरिता दि. २६ ऑगस्ट, २०२३ व दि. २७ ऑगस्ट, २०२३ www.navodaya.gov.in या संकेतस्थळावरुन करता येईल. या दुरुस्तीत परीक्षेचे माध्यम जन्मदिनांक, लिंग ( मुलगा / मुलगी / इतर) क्षेत्र (शहरी ग्रामीण) प्रवर्ग (इतर मागास, सामान्य, अनु जाती, अनु जमाती, दिव्यांग यामध्ये बदल करता येतो.

विद्यार्थी आणि पालकांचा रहिवास हा लातूर जिल्ह्यात असणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षेतून निवड झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश घेताना विद्यार्थी व पालक लातूर जिल्ह्याचे रहिवासी असल्याचे तहसीलदार यांच्याकडून प्राप्त केलेले रहिवाशी दाखला जमा करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत जवाहर नवोदय विदयालय लातूर येथील प्रवेश परीक्षेचे प्रभारी बी. डी. शेख किंवा व्ही एच खिलारे यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालय,लातुरचे प्राचार्य पी. जे. डी. विल्यम यांनी केले आहे.

## संविधान बदलासंदर्भातील वक्तव्यांवर पंतप्रधान मोदींनी खुलासा करावा : नाना पटोले

मुंबई : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान बदलण्याची भाषा आरएसएस व भाजपामधून सातत्याने केली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आर्थिक सल्लागार विवेक देबरॉय यांनी एका लेखात संविधान बदलण्याची भाषा केली आहे. विवेक देबरॉय यांच्याप्रमाणेच भाजपच्या कृपेने राज्यसभा खासदार झालेले निवृत्त सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनीही संविधानाचा मूळ ढांचा बदलण्याची गरज व्यक्त केली आहे. या दोघांच्या विधानाशी भाजपा व नरेंद्र मोदी सहमत आहेत का? याचा पंतप्रधानांनी तात्काळ खुलासा करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी संविधान बदलाची भाषा करणाऱ्यांचा खरपूर समाचार घेतला, ते पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वात श्रेष्ठ संविधान देशाला दिले आहे. या संविधानाने वंचित, मागास, दलित, अल्पसंख्याक घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले समाजातील सर्वात शेवटच्या पंक्तीतील नागरिकांना न्याय मिळेल याची तरतूद केली. सर्वांना समान हक्क, अधिकार व न्याय दिला परंतु संविधान न माननारे काही लोक आपल्या देशात आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांच्या परिवारातील संघटना सातत्याने संविधान बदलाची मागणी करत असतात. भाजपाच्या जे मनात आहे तेच आज पुन्हा एकदा बाहेर आले आहे.

**CHANGE OF NAME DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **CHOUDHARY SOMNATH PRABHURAO TO : SOMNATH PRABHUAPPA CHOUDHARY** HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **SOMNATH PRABHUAPPA CHOUDHARY** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY WIFE/ CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME :- SYED CHOUDHARY SOMNATH PRABHURAO**

**NEW NAME :- SOMNATH PRABHUAPPA CHOUDHARY**

**ADDRESS :- SARAF LINE MALGE GALLI , UDGIR DIST. LATUR M S**



## स्वच्छतेसाठी महाश्रमदान, ग्रीन लातूर वृक्ष टीमचा उपक्रम

लातूर : व्यंकटेश आय हॉस्पिटल,जटाळ हॉस्पिटल, मुक्ताई मंगल कार्यालय, पडिले कॉम्प्लेक्स समोरील, अंबाजोगाई रस्ता वरील दुभाजकाची ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या सदस्यांनी स्वच्छता केली.

या मध्ये दीड ट्रेकटर गवत, केरकचरा, दारूच्या बाटल्या, भंगार साहित्य बाहेर काढलं. मागील चार वर्षापासून ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या माध्यमातून वर्षातून दोनदा हे दुभाजक स्वच्छ करण्यात येत आहे. यावेळी झाडांना आळे करून झाडांच्या छाटण्या करण्यात आल्या.

कार्य प्रचंड होते, प्रचंड श्रम घेत त्या घाण, केरकचर्यात गुडघाभर ऊंचीच्या वाढलेल्या गवतात उभे राहून सकाळी सहा पासून आठ पर्यत श्रमदान सुरू होते. प्रशासनाला याची जाणीवही नसेल तरीही कुठलीही अपेक्षा न ठेवता ही अशी छोटी छोटी माणसे हे लातूर सुंदर करण्यासाठी दररोज झटत आहेत.

आज महाश्रमदान साठी आलेल्या व्यवसायाने डॉक्टर, वकील, शेतकरी, दुकानदार, विद्यार्थी, बँक अधिकारी, व्यवसायीक, नोकरदार अधिकारी, फोटोग्राफर असलेल्या पवन लड्डा, वैशाली यादव, दयाराम सुडे, नागसेन कांबळे, सुलेखा कारेपूरकर, राहुल माने, सिताराम कंजे, बळीराम दगडे, आदित्य स्वामी, प्रवीण भराटे, ओंकार, गणेश सुरवसे, शुभम आवड या सर्व सदस्यांनी स्वच्छ लातूर, सुन्दर लातूर, हरित लातूर करिता परिश्रम घेत अविरत कार्याचा२ १५४० वा दिवस पूर्ण केला. परिसरातील नागरिकांनी दुभाजकात कचरा न टाकता घंटा गाडी मध्ये कचरा टाकावा असे आवाहन ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने दयाराम सुडे यांनी केले.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते